Reg. No. NP CITY/236/2019-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ७]   गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २७-मार्च ४, २०२०/फाल्गुन ८-१४, शके १९४१   [ पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**आदेश**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक डिटीपी-१०७४-३४१९-वियो-ब्रम्हपुरी-आ.क्र. ६४-कलम -५०(२)-टिपीव्ही-२-७१८-२०२०.—

ज्याअर्थी, ब्रम्हपुरी नगरपरिषदेची विकास योजना (सु+वा.क्षे) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१(१) अन्वये नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र.क्र. १११-नवि-९, दिनांक २८-०६-२००२ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक २६-०८-२००२ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिध्द विकास योजना शासन अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र.क्र. १११-भाग-२-नवि-९, दिनांक १३-०७-२००५ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ०१-०९-२००५ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) या मंजूर विकास योजनेसाठी ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी हे नियोजन प्राधिकरण आहे. (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे उल्लेखिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, आ. क्र. ६४, गर्ल्स हॉस्टेल, क्षेत्र ०.३६२ हेक्टर (यापुढे "उक्त आरक्षण" असे उल्लेखिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण "समाज कल्याण अधिकारी" (Social Welfare Officer) (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे उल्लेखिलेले आहे.) हे आहेत. मौ. देलनवाडी येथील स. नं. ७२/३, क्षेत्र ७४३.६५ चौ. मी. (यापुढे "उक्त जागा" असे उल्लेखिलेले आहे.) या जागेचा उक्त आरक्षणामध्ये समावेश आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणातील जागेबाबत जमीनधारक श्री. चंदु फकीराजी भेदे यांनी दिनांक ०६-११-२०१३ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वयेची सूचना उक्त समुचित प्राधिकरणावर बजावली असता उक्त समुचित प्राधिकरणाने मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद तसेच अर्जदार यांना दिनांक २१-०३-२०१४ रोजीचे पत्रान्वये उक्त जागा (यापुढे "उक्त जागा" असे उल्लेखिलेले आहे) समाज कल्याण, विभागाच्या कामासाठी उपयुक्त नसल्याने उक्त जागेची समाज कल्याण विभागास आवश्यकता नाही. तरी शासकीय आरक्षणातून जागा मुक्त करण्यास हरकत नसल्याबाबत कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने दिनांक २७-०२-२०१७ रोजीच्या पत्रान्वये उक्त जागेवरील, उक्त आरक्षण अधिनियमाचे कलम ५० अन्वये वगळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणातील प्रस्तावाची चौकशी व खातरजमा करण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे आयोजित केलेल्या दिनांक २१-०२-२०१९ रोजी बैठकीमध्ये नियोजन प्राधिकरणाने दिनांक १०-०१-२०१७ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे व नगरपरिषदेला जागेची आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे व समूचित प्राधिकरणाने या नात्याने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर यांनी दिनांक २७-०२-२०१७ रोजी स. क्र. ७२/३ खालील ०.१५ हेक्टर जमीन "मुलींचे वसतीगृहासाठी" आवश्यक नसल्याने, आरक्षणातून मुक्त करण्याच्या उक्त अधिनियमाच्या कलम ५० मधील तरतुदीनुसार प्रस्ताव शासनास केला आहे. तसेच संचालनालयाने अपेक्षिल्यानुसार समुचित प्राधिकरणाने दिनांक १९-११-२०१८ चे पत्रान्वये सदर प्रकरणी जागेची आवश्यकता नसल्याचे व प्रस्तावाबाबत आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविलेले असल्याचे स्पष्टीकरण केले आहे;

आणि ज्याअर्थी, समुचित प्राधिकरण व नियोजन प्राधिकरण यांनी कळविल्यानुसार व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त आरक्षणांची त्यांना आवश्यकता नसल्याची खात्री पटल्यावरुन उक्त जागा उक्त आरक्षणामधून वगळणे आवश्यक असल्याचे संचालक, नगर रचना यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, दिनांक २०-०४-२०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार उक्त जागेचे धारक श्री. चंदू फकीराजी भेदे यांनी त्यांचे मालकीचे क्षेत्रासाठी सन २०१९ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या जमीन मुल्याच्या ५ टक्के दराने येणा-या अधिमूल्य रकमेपैकी ५० टक्के शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रु. ३४,१२५ नगर रचनाकार, चंद्रपूर शाखा यांचेकडील लेखाशीर्षामध्ये दिनांक २८-०६-२०१९ रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५० टक्के अधिमूल्याची रक्कम रु. ३४,१२५ नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचेकडे दिनांक २६-०६-२०१९ रोजी जमा केली असल्याचे नगर रचनाकार, चंद्रपूर शाखा यांनी पत्र क्र. १५५४, दिनांक ०९-०८-२०१९ अन्वये संचालनालयास कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक ०१-१२-२०१६ अन्वये सर्व नगरपालिका/नगरपंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने उक्त अधिनियमाचे कलम ५०(२) खालील अधिकार, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ५०(२) अन्वये संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे उक्त आरक्षण उक्त जागेपुरते वगळण्यास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी दिनांक १३-०७-२००५ च्या अन्वये वगळलेल्या भागाच्या पुनर्प्रसिध्द विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेमध्ये पुढे दिल्याप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेच्या शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

मंजूर विकास योजना ब्रम्हपुरी मधील मौ. देलनवाडी स. नं. ७२/३ या जागेवरील आरक्षण क्र. ६४, " मुलांचे वसतिगृह," क्षेत्र ७४३.६५ चौ.मी. या आरक्षणाखालील जमीन सोबतच्या मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे उक्त आरक्षणातून वगळण्यात येत आहे.

सदरचा बदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा यासोबत जोडला आहे.

**टीप :-** (१) वरील बदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी, नगर परिषद, ब्रम्हपुरी यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात येत आहे.

(२) सदर आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर *www.dtp.maharashtra.gov.in* वर देखील प्रसिध्द करण्यात येत आहे.

**नो. र. शेन्डे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणेः
दिनांक १२ फेब्रुवारी २०२०.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

## BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

### *ORDER*

No. DTP-1074-3419-DP-Bramhapuri-Site No. 64-Sec. 50(2)-TPV-2-718-2020.—

Whereas, the Development Plan of Bramhapuri Municipal Council has been partly Sanctioned under Section 31(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2299-1001-CR-101-UD-9, dated 28-06-2002 and came into force *w.e.f.* date 26-08-2002 (hereinafter referred to as "the said Development Plan"); and the Municipal Council, Bramhapuri is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to "as the said Planning Authority");

And whereas, the Development Plan of Excluded part is Sanctioned by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2299-1001-CR-101-Part-2-UD-9, dated 13-07-2005 and came into force *w*.e.f. dated 01-09-2005;

And whereas, in the said Development Plan, Site No. 64 is reserved for "Girls Hostel" having an area of 0.3620 Hectars and while sanctioning the Development Plan of Excluded area the southern part of the said reservation is deleted from reservation and included in Residential Zone, hence the area under reservation remains as 0.15 Hect. (hereinafter referred to as "the said Reservation") and "Social Welfare Officer" is the Appropriate Authority for the said reservation (hereinafter referred to as "the said Appropriate Authority"). The land bearing S. No. 72/3 admeasuring area 0.15 Hectars, out of these 743.65 $m.^2$ area of the village Delhanwadi (hereinafter referred to as "the said land") is included under the said reservation;

And whereas, the land owner Shri Chandu Fakiraji Bhede on 06-11-2013 has given notice u/s 127 of the said Act to the said Appropriate Authority, regarding the said land under said reservation. The said Appropriate Authority *vide* its letter dated 21-03-2014 communicated to the said Planning Authority and the land owner that the said land is not required for the said purpose and therefore communicate to delete the reservation on the said land;

And whereas, the said Planning Authority *vide* its letter date 16-03-2016 communicated to the said Appropriate Authority to submit the proposal for the deletion of the said reservation on the said land as per the provisions of Section 50 of the said act;

And whereas, the said Appropriate Authority *vide* letter date 27-02-2017 has submitted to the State Government and Directorate of Town Planning, Maharashtra State, Pune the proposal under-Section 50 of the said act for deletion of the said land;

And, whereas, Planning Authority has clarified about their consent for deletion of reservation u/s 50 in the meeting dated 21-02-2019 and the said Appropriate Authority already on dated 27-02-2019 has submitted the proposal of deletion of the said reservation on the said land to the Government as per the provisions of Section 50 of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966;

And whereas, as per the request of Planning Authority and Appropriate Authority and after making necessary enquiry it is now clear that the land under the said reservation is no longer required to Social Welfare Officer, Chandrapur and the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that the said proposal of deletion of the said reservation should be sanctioned;

And whereas, the Town Planner, Chandrapur Branch *vide* their letter dated 09-08-2019 and applicant's letter date 03-07-2019 respectively communicated that, as per the Government directives dated 20-04-2016, the land owner of the said land under reservation Shri Chandu Fakiraji Bhede have deposited Rs. 34,125 towards the 50% Government share of 5% premium amount of land value for the area under reservation as per the rate prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2019 in the Government Treasury on 28-06-2019 through the Town Planner, Chandrapur Branch and remaining 50% of the 5% premium amount Rs. 34,125 payable to the Planning Authority, has been deposited;

And whereas, the Government in Urban Development Department *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 50(*2*) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils/ *Nagar Panchayat* and for the development Plans undertaking by *Zilla Parishad* as a Planning Authority;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the deletion the said reservation in respect of the land u/s. 50*(2)* of the said Act and for that purpose amends the notification of the said Development Plan, sanctioned dated 13-07-2005 as follows :–

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :–

Site No. 64, "Girls Hostel" is deleted, in respect of S. No. 72/3, area 743.65 $m.^2$ of village Delhanwadi, as shown on the Part Plan attached hereto.

*Note :–* (1) A copy of the Part Plan of the said Development Plan showing the aforesaid modification shall be made available for inspection in the Office of Chief Officer, Bramhapuri Muncipal Council during office hours on all working days.

(2) This Order shall also be published on the Directorate website. *www.dtp.maharashtra.gov.in*

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 12th February 2020.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २७.

## मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांजकडून

**सेवाग्राम विकास योजनेच्या क्षेत्रातील ग्रामपंचायत बरबडी, मौजा बरबडी, ता. जि. वर्धा येथील श्री. अशोक महादेवराव झाडे व सौ. शारदा रमेशचंद्र वर्मा यांचे मालकीचे शेत सर्व्हे क्र. २२२/१ हे असून एकूण आराजी १.२६ हे. आर औद्योगिक क्षेत्रामधून काढून रहिवासी क्षेत्रामध्ये बदल करणेबाबत.**

क्रमांक जिपव-ग्रापं-अनुदान-वशि-१९८-२०२०.——

ग्रामपंचायत बरबडी मधील जिल्हा परिषद, वर्धा कक्षेतील शेत सर्वे क्र. २२२/१ मध्ये विषयांकित बदल करण्याकरीताचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचा असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ जून १९९० चे क्र. वियो-सेवाग्राम (बिनिप)-टिपीव्ही-६-७६९१, नुसार वर्धा जिल्हा परिषदेने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसूचना क्रमांक डिपी सेवाग्राम-ॲडमिन-२, दिनांक १८ मे, १९७७ द्वारे सेवाग्राम, नांदोरा, कामथवाडा, वरुड आणि बरबडी ह्या ५ ग्रामपंचायतीच्या संपूर्ण क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार वापरण्याची परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग निर्णय क्रमांक टीपीव्ही १०८६-३७९१-सीआर-१०३-१-८७-नवि-१७, दिनांक ५ जानेवारी १९८७ अन्वय “ब” व “क” वर्ग नगर परिषद तसेच बिगर नगर परिषद शहरांच्या विकास योजनांना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार अंतिम मंजुरी देण्याबाबतचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे द्वारे दिनांक ३१ मार्च १९९० या दिनांकापासून विकास योजना अंमलात आली. करीता सेवाग्राम विकास योजनेनुसार मौजा बरबडी गावाचा विकास करण्याचे दृष्टीने वरील मंजूर विकास योजनेमध्ये खालीलप्रमाणे किरकोळ फेरबदल करणे आवश्यक आहे.

मंजूर विकास योजनेतील मंजूर अभिन्यास मौजा बरबडी येथील सर्वे क्र. २२२/१ एकूण आराजी १.२६ हे. आर हे क्षेत्र श्री. अशोक महादेवराव झाडे व सौ. शारदा रमेशचंद्र वर्मा यांचे मालकीचे आहे. त्यांनी सदरचे क्षेत्राचा वापर निवासी प्रयोजनाकरीता करण्याचे ठरविले आहे. त्या करीता त्यांनी जिल्हा परिषदेकडे दिनांक ५ सप्टेंबर २०१९ ला कागदपत्रांचे पुर्ततेसह प्रस्ताव सादर करून क्षेत्र बदल करण्याची विनंती केलेली आहे. सोबत १. ग्रामपंचायत बरबडी यांचे दिनांक ६ जुलै २०१९ चे सभेचे २०१९ चे सभेचे ठराव अन्वये सदरचे क्षेत्र बदल करण्यास मंजुरी दिलेली आहे. २. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे पत्र क्र. DHO-UIP-Site Insp.-१९-१०६०-१९, दिनांक ०८-०७-२०१९ अन्वये शेत सर्व्हे क्र. २२२/१ एकूण आराजी १.२६ हेक्टर आर, हे रहिवासी करण्यास मंजुरी दिलेली आहे. तसेच, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १८ डिसेंबर २०१९ चे विषय क्र. ७ अन्वये सेवाग्राम विकास योजनेतील मौजा बरबडी येथील शेत सर्वे क्र. २२२/१ एकूण आराजी १.२६ हे.आर हे औद्योगिक क्षेत्रातून रहिवासी क्षेत्रात बदल करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर प्रस्तावाबाबत सूचित करण्यात येते की, ज्या कुणाला वरील फेरबदलाबाबत काही आक्षेप अथवा सूचना पाठवावयाच्या असतील त्यांची ही सूचना वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावेत. विहित मुदतीतील आक्षेप प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येईल. सदर्हु किरकोळ फेरबदल दर्शविणारा सेवाग्राम विकास योजनेचा नकाशा कार्यालयीन वेळात सर्व दिवशी अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

**डॉ. सचिन ओंबासे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक १४ फेब्रुवारी २०२०.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८.

## अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये.**

क्रमांक ३९७-नपवा-२०२०.——

वाडी नगर परिषद क्षेत्रात प्रारुप विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिद्धीकरण क्रमांक-वाडी-कलम २६ प्रसिद्धीकरण-ससंनाग-२८२, दिनांक १० फेब्रुवारी २०२०, ज्याअर्थी, वाडी नगर परिषद विशेष सभेचे ठराव क्र. १६, दिनांक १९-०९-२०१६ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) अन्वये प्रदान करण्यात

आलेल्या अधिकाराचा वापर करून नगर परिषदेच्या मुठ हद्दी अंतर्भूत मौजा वाडी या क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अ नागपूर विभागीय पुरवणी दिनांक २७ एप्रिल - ३ मे २०१७ व दैनिक लोकमत (मराठी) नागपूर तसेच या दैनिक हितवाद (इंग्रजी) नागपूर वृत्तपत्रात दिनांक १८ एप्रिल २०१७ रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ अन्वये नेमलेल्या नगर रचना अधिकारी यांनी उपरोक्त क्षेत्रात विद्यमान जमीन वापर नकाशा नगर परिषद, वाडी दिनांक ३० जानेवारी २०१८ रोजी हस्तांतरित केला आहे आणि प्रारूप विकास योजना दिनांक २० फेब्रुवारी २०२० वाडी नगर परिषदेस कलम २६ खाली प्रसिद्ध करण्यासाठी सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, वाडी नगर परिषदेची विशेष सभा दिनांक २० फेब्रुवारी २०२०, ठराव क्र. ५ अन्वये वाडी नगर परिषदेने प्रारूप विकास योजना व अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये प्रसिद्धीकरण्यास मंजुरी दिली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून नकाशा नगर परिषद वाडी सूचित करते की, वाडी नगर परिषद क्षेत्राची प्रारूप विकास योजना व अहवाल तयार करण्यात आलेली आहे.

त्याकरिता सदर नोटीस राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून साठ (६०) दिवसांच्या कालावधीत यांचे जनतेकडून सूचना/आक्षेप मागविण्यात येत आहेत. सूचना/आक्षेप मुख्याधिकारी, नगर परिषद, वाडी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. म्हणजे प्राप्त सूचना/आक्षेपावर सदर विकास योजना शासनाकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी त्यावर आवश्यक तो विचार होईल तसेच उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये वरील नमूद प्रारूप विकास योजना व अहवालाची प्रत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेस निरिक्षणासाठी नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून साठ (६०) दिवसासाठी खालील कार्यालयात उपलब्ध असेल.

(१) मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, वाडी.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय, प्रशासकीय इमारत क्र. ०१, दुसरा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

(अवाच्य),
अध्यक्ष,
नगर परिषद, वाडी.

वाडी :
दिनांक २० फेब्रुवारी २०२०.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २९.

## BY PRESIDENT, NAGAR PARISHAD

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 UNDER SECTION 26.

No. 397-NPW-2020.—

Publication of Draft Development Plant of Nagar Parishad Wadi U/s 26 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, No. D.D.P. Wadi-Sec. 26 Publication-ADTP-NGP-282 Dt. 10-02-2020.

Whereas, in consonance with the resolution No. 16, Dt. 19-09-2016 passed by the General Body Nagar Parishad, Wadi, Dist. Nagpur has declared its intention to prepare the Development plan of Wadi Nagar Parishad, Dist. Nagpur in Maharashtra Govt. Gazette Part-1A Nagpur Divisional Supplement Dt. 18 April 2017 and Daily Newspaper Lokmat (Marathi) Dt. 27 April and Daily Newspaper Hitavad (English) Dt. 3 May 2017 in pursuance of the power conferred by sub-section (*1*) of Section 23 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

And whereas, the Town Planning Office appointed under Section 24 of the Said Act, has prepared & submitted the existing Land use Map of Nagar Parishad, Wadi, Dist. Nagpur on Dt. 30 January 2018 & submitted Draft Development Plan of Nagar Parishad, Wadi on Dt. 20 February 2020.

And whereas, the General Body Nagar Parishad, Wadi, Dist. Nagpur *vide* resolution No. Dt. 20 February 2020 has approved the draft development plan of Wadi Nagar Parishad for publication under Section 26 of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*1*) of Section 26 of the said Act, and all other powers enabling in this behalf Nagar Parishad, Wadi hereby give notice that the draft development plan of Nagar Parishad, Wadi alongwith its report have been prepared and published under Section 26 of the said Act, for which objections or suggestions are invited from the public for a period of 60 (sixty) days from the Publication of this notice in the *Official Gazette*, the objection of suggestions shall reach to Chief Officer, Nagar Parishad, Wadi, Dist. Nagpur during office hours on all working days so as to consider the same before submitting the said plan to the Government for final sanction under Section 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Further, in pursuance of sub-section *(1)* of Section 26 of the said Act, copy of aforesaid draft development plan alongwith its report are available for inspection for public during office hours on all working days at the following offices, for a period of 60 (sixty) days from publication of this notice in the Maharashtra Government Gazette.

(1) Chief Officer, Nagar Parishad, Wadi, Dist. Nagpur.

(2) Assistant Director of Town Planning, Branch Office, 2nd Floor, Administrative Building 1, Civil Lines, Nagpur.

(Illegible),
President,
Nagar Parishad,
Wadi.

Wadi :
Dated the 20th February, 2020.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३०.

**अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अंतर्गत फेरबदल**

क्रमांक नपका-वि.यो.-फे-१८२-२०२०.——

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टी.पी.एस-२४०६-३१२३-प्र.क्र.१३३-०७-नवि-९, दिनांक ४ नोव्हेंबर २००८ अन्वये काटोल शहरासाठी विकास योजना मंजूर केली आहे व ती दिनांक १५-१२-२००८ पासून अंमलात आली आहे.

ज्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाने म्हणजे नगर परिषद, काटोल ने मंजूर विकास योजनेतील पुढे दर्शविलेल्या तक्त्यामधील जागेचे वापरामध्ये आराजी फेरबदल करण्याचे नगरपालिकेचे सभेने ठरविलेले आहे. या बदलामुळे मंजूर झालेल्या विकास योजनेच्या स्वरूपात विशेष बदल होणार नाही.

**तक्ता**

| अ. क्र. | विकास आराखडयानुसार सर्व्हे क्रमांक | विकस योजनेप्रमाणे आरक्षण | आराजी | प्रस्तावित आरक्षण | नगरपरिषद सभेचा ठराव क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ८७९ (भाग) | रहिवासी प्रयोजनासाठी | ०.१५ हे. आर | मुस्लीम कब्रस्थान | विशेष सभा ठराव क्र. ०१, दिनांक ३१-०१-२०२०. |

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित बदल दर्शविणारा नकाशा तयार करून तो नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळात सर्व जनतेस अवलोकनार्थ खुला ठेवला आहे. “ ”

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार अशी “जाहिर सूचना” देण्यात येत आहे की, वरील बदलाबाबत जर कोणत्याही व्यक्तीला काही हरकत असेल अथवा सूचना करावयाची असेल तर त्यांनी लेखी स्वरूपात अध्यक्ष, नगर परिषद, काटोल यांचेकडे ही “ जाहिर सूचना” “महाराष्ट्र शासन राजपत्रात” प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या पेक्षा जास्त नाही या कालावधीत द्यावी.

अशा सर्व सूचनांचा योग्य तो विचार वरील बदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी करण्यात येईल.

**वैशाली ठाकूर,**
अध्यक्षा,
नगर परिषद, काटोल.

काटोल :
दिनांक २० फेब्रुवारी २०२०.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३१.

BY PRESIDENT OF MUNICIPAL COUNCIL

MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. MCK-P.S.-D.P.M.-182-2020.—

Whereas, the Development Plan of Katol has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's letter No. TPS-2406-3123-Case No. 133-07-UD-9, dated 04-11-2008 and it has came into force with effect from 15-12-2008.

Whereas, the Planning Authority *i.e.* Municipal Council, Katol has now decided to make areas modification in the aforesaid sanctioned Development Plan of Katol in respect of the purpose as per Municipal Resolution in following chart. This change will not change the character of the aforesaid sanctioned Development Plan of Katol.

CHART

| Sr. No. | Survey No. | Reservation as per D. P. | Area as per D. P. | Proposed for Change | Sanction Authority Municipal Resolution and date |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 879 (Part) | Residential Zone | 0.15 H.A. | Muslim Burial Ground | Special Committee Resolution No. 1, Date 31-01-2020. |

And whereas, the Plan showing the proposed Modification is kept open in the Office of Municipal Council, Katol during office hours for inspection of public.

Therefore, under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, it's hereby notified that any person having any objection or suggestion regarding the proposed modification may communicate the same in writing to the President, Municipal Council, Katol within a period of not more than one month from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette.*

The objections shall be considered by the Planning Authority before submitting the proposal to the Government for sanction.

VAISHALI THAKUR,
President,
Municipal Council, Katol.

Katol :
Dated the 20th February 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.